# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 28/07/2020 (मंगळवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर मौजा भिवापुर चेक पोस्ट येथे दिनांक 26/07/2020 चे 23.45 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. पी.– 49/डी – 6491 क्रमांकाच्या पिकअप गाडीला थांबपुन तपासले असता आरोपी नामे क्र. 1) आवेश इसाक खान पठाण, वय 23 वर्ष, रा. शिव नगर नागभिड, जि. चंद्रपुर व 2) अमर बंडु मेश्राम(गाडी मालक), वय 20 वर्ष, रा. नागभिड यांच्या ताब्यातुन एकुण 11 (गाई,गोरे) कि. 1,10,000/–रू. ची जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आले. घटनास्थळावरून जनावरे व वाहनासह एकुण किंमती 7,10,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस शिपाई विनोद भोयर, पो.स्टे. भिवुपर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 109 भादवी, सहकलम 11(1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(ब), 9 प्राणी सरंक्षण अधिनियम सहकलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोना निलाक्षा नेहारे या करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर